डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/२०१९–२०/४०१ दि. २५/११/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

विषय : तंबाखूमुक्त शाळा अभियान राबविणेबाबत

महोदय,

मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमध्ये व्यसनविरोधी मानसिकता निर्माण करणे याकरिता सलाम मुंबई फाउंडैशन, शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, जिल्हा प्रशासन, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या समन्वयातून महाराष्ट्रात 'तंबाखूमुक्त शाळा अभियान' राबवित आहे. या अभियानामुळे यवतमाळ, वर्धा, धुळे या जिल्ह्यामधीलसर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा तंबाखूमुक्त झाल्या आहेत.

तसेच सपूर्ण महाराष्ट्र व्यसनमुक्त होण्यासाठी १४ नोव्हेंबर (बालदिन) २०१९ ते ४ फेब्रुवारी २०२० (जागतिक कर्करोग दिन) ह्या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी तंबाखूमुक्त न झालेल्या आणि आपल्या महाविद्यालयात किंवा घराजवळील १–१ शाळा दत्तक घ्याव्यात. रासेयो स्वंयसेवकांनी आठवडयातून एक दिवस २ तास (४ आठवडे) शाळेत जाऊन तंबाखूमुक्त शाळेचे निकष पूर्ण करण्यासाठी आणि सलाम मुंबई फाउंडेशनच्या 'टोबॅको फ्री स्कूल ॲपमध्ये' अपलोड करण्यासाठी मुख्याध्यापकांना मदत करावी. तसेच उपक्रम अधिक यशस्वीरित्या राबवण्याकरिता सोबत जोडलेल्या माहिती पत्रकाचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत– मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांचे पत्र

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, 3 महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५.

===============================================================

क्रमांक: रासेयो-२०१९/प्र.क्र.१४९/साशि-७ दिनांक: २२.११.२०१९.

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे/संचालनालये

**विषय- तंबाखूमुक्त शाळा अभियान**
**संदर्भ- वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक, तंबाखू नियंत्रण अभियान, सलाम मुंबई फाउंडेशन यांचे पत्र दि. ०५.११.२०१९**

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन पत्रान्वये तंबाखूमुक्त शाळा अभियान राबविण्याबात कळविण्यात आले आहे. तरी आपण त्यासाठी सहकार्य करावे.

(डॉ. अतुल हं.साळुंके)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी.

सोबत- वरीलप्रमाणे.

Government of
Maharashtra

# तंबाखूमुक्त शाळा अभियान

## १४ नोव्हेंबर (बालदिन) २०१९ ते ४ फेब्रुवारी, २०२० (जागतिक कर्करोग दिन) ह्या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी 'तंबाखूमुक्त शाळा अभियानास' ८ तास (४ व्हिजिट)उपलब्ध होणेबाबत प्रस्ताव...

दिनांक - ५ नोव्हेंबर, २०१९

प्रति,

डॉ. अतुल साळुंखे

राज्य समन्वयक

राष्ट्रीय सेवा योजना

महाराष्ट्र

विषय - १४ नोव्हेंबर (बालदिन) २०१९ ते ४ फेब्रुवारी, २०२० (जागतिक कर्करोग दिन) ह्या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी 'तंबाखूमुक्त शाळा अभियानास' ८ तास (४ व्हिजिट)उपलब्ध होणेबाबत प्रस्ताव...

<u>संदर्भ - शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांचे दि. ६ जून २०१९चे महाराष्ट्रातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये तंबाखूमुक्त शाळा धोरण राबविण्याबाबतचे परिपत्रक</u>

माननीय महोदय,

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमध्ये व्यसनविरोधी मानसिकता निर्माण करणे, त्यांना व्यसनमुक्त राखणे ह्यासाठी सलाम मुंबई फाउंडेशन, शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, जिल्हा प्रशासन, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम आणि राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्रात 'तंबाखूमुक्त शाळा अभियान' राबवित आहे. ह्या अभियानाद्वारे आतापर्यंत यवतमाळ, वर्धा ह्या दोन जिल्ह्यांतील सर्व जि. प. शाळा, नंदुरबार आणि धुळे ह्या जिल्ह्यांतील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळा तंबाखूमुक्त घोषित झाल्या आहेत. ह्या अभियानामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकवृंदच प्रभावित झाले नसून पालक, अधिकारी आणि लोकप्रतिनिधीही तंबाखूमुक्त बनले आहेत.

१४ नोव्हेंबर (बालदिन) २०१९ ते ४ फेब्रुवारी, २०२० (जागतिक कर्करोग दिन) ह्या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी 'अद्याप तंबाखूमुक्त न झालेल्या' आणि आपल्या महाविद्यालय किंवा घराजवळील १-१ शाळा दत्तक घ्याव्यात. विद्यार्थ्यांनी

आठवड्यातून एक दिवस २ तास (४ आठवडे) शाळेत जाऊन तंबाखूमुक्त शाळेचे निकष पूर्ण करण्यासाठी आणि सलाम मुंबई फाउंडेशनच्या 'टोबॅको फ्री स्कूल अँपमध्ये' ११ निकषांचे ११ फोटोज अपलोड करण्यासाठी मुख्याध्यापकांना मदत करावी.

प्रक्रिया पुढीलप्रमाणे असेल –

| | |
|---|---|
| NSS विद्यार्थी शाळेत जाण्यापूर्वी | १) सलाम मुंबई फाउंडेशनद्वारे राज्य समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र ह्यांस प्रस्ताव इमेलद्वारे सादर करणे.<br>२) राज्य समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र ह्यांसकडून प्रस्तावास लेखी मंजुरी मिळणे आणि विविध जिल्ह्यांतील जिल्हा समन्वयक (NSS) ह्यांस सूचित करणे.<br>३) सलाम मुंबई फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक (NGO) लेखी मंजुरी पत्र प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी आणि सर्व तालुका गटशिक्षण अधिकारी ह्यांस सादर करतील आणि पुढील नियोजन करतील.<br>४) सलाम मुंबई फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक (NGO), प्रत्येक तालुक्यातील महाविद्यालयांच्या NSS प्रोग्राम ऑफिसरना भेटून सदर महाविद्यालयातून अभियानात सहभागी होणाऱ्या NSS विद्यार्थ्यांची नावे आणि दत्तक घेतल्या जाणाऱ्या शाळांची नावे अशी यादी मिळवतील.<br>५) तालुका समन्वयक (शिक्षण विभाग) ह्यांद्वारे सहभागी NSS विद्यार्थ्यांचे २ तासांचे प्रशिक्षण आयोजित होईल.<br>प्रशिक्षणातील विषय - तंबाखूतील विविध हानिकारक तत्त्वे, तंबाखूचे विविध दुष्प्रभाव, तंबाखू कसा सोडवायचा, तंबाखू नियंत्रण कायदा, तंबाखूमुक्त शाळा निकष आणि App Registration<br>६)NSS विद्यार्थी, शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटून किंवा फोनद्वारे ते कोणत्या दिवशी शाळेत तंबाखूमुक्त शाळा अभियान राबविण्यासाठी येणार आहेत त्याची पूर्वकल्पना देतील. |

| | |
|---|---|
| शाळेतील उपक्रम | <u>१ला दिवस (पहिला आठवडा) -</u> NSS विद्यार्थी, शालेय विद्यार्थ्यांना तंबाखूतील विविध हानिकारक तत्त्वे, तंबाखूचे विविध दुष्प्रभाव, तंबाखू कसा सोडवायचा ह्याबद्दल तोंडी अथवा स्वनिर्मित पोस्टर्सद्वारे माहिती देतील. दिलेली माहिती शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या घरी पालकांना आणि परिजनांना सांगण्याचा गृहपाठ देतील आणि पुढील आठवड्यासाठी पोस्टर्स आणि घोषणापट्ट्या बनविण्यासाठी १ कार्ड पेपर आणि रंग आणण्याची विनंती करतील.<br><br><u>तंबाखूमुक्त शाळा निकषपूर्तीसाठी उपक्रम –</u><br>१) NSS विद्यार्थी, शाळेत 'तंबाखूमुक्त शाळेची नोटीस' लागली नसल्यास ती नोटीस कार्डपेपरवर लिहून दर्शनी भागात चिकटवतील.<br>२) मुख्याद्यापकांना शाळा व्यवस्थापन समितीची सभा आयोजित करण्यास सांगून तंबाखूमुक्त शाळा विषयावर चर्चा करून त्याचे प्रोसिडिंग लिहिण्यास सांगतील.<br><br><u>२रा दिवस (दुसरा आठवडा) -</u> NSS विद्यार्थी, शालेय विद्यार्थ्यांना गेल्या आठवड्यात दिलेल्या माहितीवर काही प्रश्न विचारतील. शालेय विद्यार्थ्यांनी अचूक उत्तरे दिल्यास त्यांचे अभिनंदन करतील किंवा चुकीची उत्तरे दिल्यास त्यांना पुन्हा ती माहिती थोडक्यात सांगतील. तसेच तंबाखू नियंत्रण कायदा आणि तंबाखूमुक्त शाळा निकष ह्यांची माहिती देतील. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या परिजनांना तंबाखूविरोधी माहिती दिली असल्यास त्यांचे कौतुक करतील आणि त्याची नोंद ठेवतील.<br><br><u>तंबाखूमुक्त शाळा निकषपूर्तीसाठी उपक्रम -</u> १) तंबाखूतील विविध हानिकारक तत्त्वे, तंबाखूचे विविध दुष्प्रभाव, तंबाखू कसा सोडवायचा ह्या विषयावर पोस्टर्स आणि घोषणापट्ट्या बनवून प्रत्येक वर्गात आणि स्टेशनरीवर चिकटवणे. |

| | |
|---|---|
| | <u>दिवस ३रा (तिसरा आठवडा)</u> - NSS विद्यार्थी, शालेय विद्यार्थ्यांसाठी डॉक्टर अथवा डेंटिस्टचे तंबाखूचे दुष्परिणाम ह्याविषयीचे मार्गदर्शनपर सत्र शाळेत आयोजित करतील.<br>ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या परिजनांना तंबाखूविरोधी माहिती दिली आहे, तंबाखूमुक्तीच्या विविध उपक्रमांत हिरिरीने भाग घेतला आहे आणि आपल्या परिचित व्यक्तींना तंबाखूमुक्त करण्यासाठी प्रयत्न केले आहेत त्यांना पुष्प देऊन त्यांचे कौतुक करतील.<br><br><u>दिवस ४था (चौथा आठवडा)</u> - NSS विद्यार्थी, शाळेत कोणीही तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करीत नाही आहे ह्याची खात्री करून; NSS विद्यार्थी, शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी तंबाखूमुक्त शाळा विषयावर राबविलेल्या उपक्रमांचे फोटोज निकषांनुसार Tobacco Free School App वर अपलोड करतील. |

माननीय महोदय, महाराष्ट्रातील नवी पिढी व्यसनमुक्त राहावी आणि महाराष्ट्रातील सर्व शाळा तंबाखूमुक्त व्हाव्यात ह्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा आम्ही सक्रिय सहभाग इच्छित आहोत. आपण सदर प्रस्तावास मान्यता द्यावी ही नम्र विनंती आहे.

आपल्या सूचनेच्या आणि सहकार्याच्या अपेक्षेत...

धन्यवाद!

अजय पिळणकर

वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक

तंबाखू नियंत्रण अभियान (महाराष्ट्र)

सलाम मुंबई फाउंडेशन